# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.06.2024** **वार – बुधवार**

---

**पुपा**

पुणे जिल्हयाच्या पूर्व भागातील तालुक्यात चांगला पाऊस झाला असला तरी अन्य तालुक्यात अद्यापी पुरेसा पाऊस झालेला नाही, त्यामुळं किमान १०० मिलीमीटर पाऊस पडल्यानंतरच पेरणी करावी, असा सल्ला पुणे कृषी विभागानं दिला आहे. मावळ तालुक्यात भात या मुख्य पिकाबरोबरच सोयाबीन, भूईमूग आणि इतर कडधान्यांची लागवड केली जाते. भाताची १३ हजार हेक्टरवर लागवड होणार असून सोयाबीनची ५५० हेक्टरवर लागवड होणार आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागानं पूर्ण तयारी केली आहे.

**शाहू**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं आयोजित राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार प्रबोधन पर्वाच्या समारोपात आज शिवकालीन दुर्मिळ शस्त्रं तसंच शिवकालीन, मध्यकालीन दस्तऐवजांचं प्रदर्शन भरवण्यात आलं होतं. शिवकालीन युध्दकला प्रात्यक्षिक आणि मैदानी खेळांचंही आयोजन करण्यात आलं होतं. दुपारच्या सत्रात शाहीरी पोवाड्याचा कार्यक्रम सादर करण्यात आला. संध्याकाळच्या सत्रात लावणी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

**शाहू**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची १५० वी जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉक्टर सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉक्टर पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉक्टर विजय खरे यांनी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. याप्रसंगी अधिसभा सदस्य, शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांचे प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**शाहू**

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्यायमुर्ती सुनिल शुक्रे यांनी नवीन प्रशासकीय भवनात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**सावरकर**

सावरकर कधीच प्रतिगामी नव्हते तर ते प्रखर राष्ट्राभिमानी, राष्ट्रनिष्ठावादी होते. समाज सुधारणेच्या बाबतीत त्यांचे योगदान मोठं आहे. त्यांची राष्ट्रभक्ती नाकारणं हा देशद्रोह आहे असं प्रतिपादन जेष्ठ विचारवंत डॉक्टर श्रीपाल सबनीस यांनी केलं. मातंग साहित्य परिषदेतर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त ‘स्वातंत्र्यवीर सावरकर: समज गैरसमज’ या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी मातंग साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉक्टर धनंजय भिसे उपस्थित होते.

**मतदार**

पुणे शहरासह जिल्ह्यातील मतदारांची वाढीव संख्या लक्षात घेता मतदान केंद्रांची पुनर्रचना करणं आवश्यक असल्याचं जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी स्पष्ट केलं आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जिल्ह्याच्या काही भागात मतदानाच्या प्रक्रियेला अतिशय विलंब झाला होता. आगामी विधानसभा निवडणुकीत कोणाही मतदाराची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली जाईल असं दिवसे यांनी म्हटलं आहे.

**गॅस**

पुणे शहराच्या विविध भागात सध्या भूमिगत वायूवाहिनी फुटून वायूगळती आणि त्यातून आगी लागण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. महानगर गॅस कंपनीनं मात्र या दुर्घटनांसाठी महापालिका प्रशासनालाच जबाबदार ठरवलं असून आम्हाला कोणतीही पूर्वसूचना न देता रस्ते खोदल्यामुळं हे प्रकार घडत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. महानगर गॅस कंपनी सध्या पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील १० हजाराहून अधिक गृहनिर्माण सोसायट्यांमधून ६ लाखांहून जास्त सदनिकांमध्ये भूमिगत वाहिनीतून थेट गॅस पुरवठा केला जातो. त्यासाठी कंपनीनं २३०० किलोमीटर लांबीच्या भूमिगत गॅस वाहिन्यांचं जाळं तयार केलं आहे.

**पब**

पुणे शहर आणि परिसरात केवळ २३ अधिकृत पब आणि डिस्कोथेक अर्थात नृत्य जुगाराचे अड्डे असल्याची माहिती पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून देण्यात आली आहे. कल्याणीनगर दुर्घटनेननंतर पुण्यातील माहिती अधिकार क्षेत्रात काम करणाऱ्या एका वकिलांनी पोलीस आयुक्त कार्यालयात माहितीच्या अधिकाराखाली विचारलेल्या प्रश्नाला लेखी स्वरूपात दिलेल्या उत्तरात याबद्दलची माहिती देण्यात आली आहे. प्रत्यक्षात शहराच्या विविध भागात आणि उपनगरात मिळून शेकडोंच्या संख्येनं पहाटेपर्यंत पब सुरु असल्याचं आढळून आलं आहे.

**पालखी**

आषाढीवारी पालखी सोहोळ्याच्या अनुषंगानं पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं सुरु असलेली अंतिम टप्प्यातील कामे प्रगतीपथावर असल्याचं अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी सांगितलं. मार्गातील दुभाजकांमध्ये वाढलेल्या शोभेच्या झाडांची छाटणी करून सुशोभीकरणाच्या कामांना वेग देण्याच्या सूचना खोराटे यांनी दिल्या.

**येरवडा**

येरवडा कारागृहात प्रतिस्पर्धी गटाला माहिती दिल्याच्या संशयातून एका कैद्याला तिघांनी मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी तीन कैद्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

**क्रिकेट**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेनं अक्षय दरेकर यांची २०२४-२५ या हंगामासाठी वरिष्ठ पुरुष गटाच्या निवड समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. संघटनेचे सचिव कमलेश पिसाळ यांनी याबाबतची घोषणा केली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**